# महाराष्ट्र शासन

## विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, कोकण विभाग, पनवेल


**शासकीय अध्यापक महाविद्यालय परिसर, पनवेल,जि.रायगड-४१० २०६.**

ई-मेल पत्ता :- jdhe.pnvl-mah@gov.in Website: http://jdhepanvel.org

दूरध्वनी व फॅक्स नंबर (०२२-२७४५३८२०)


जा.क्र.: विसस/उशि/कोविप/शिष्यवृत्ती/२०१९/ 1664 दि. 22/7/19

**अत्यंत महत्वाचे परिपत्रक**

विषयः **केंद्र शासन पुरस्कृत शिष्यवृत्ती योजनांसाठी NSP पोर्टलवरुन महाविद्यालयांची नोंदणी करणेबाबत...**

संदर्भः मा. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र.उशिसं-२०१९-२०/केंद्र पुरस्कृत शिष्यवृत्ती/ ९६९९, दि.२०.०७.२०१९

केंद्र शासनाच्या एन.पी.एस. पोर्टलव्दारे उच्च शिक्षण संचालनालयामार्फत **१.** केंद्र शासन पुरस्कृत अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांसाठी पोस्ट मॅट्रीक शिष्यवृत्ती योजना, **२.** महाविद्यालयीन व विद्यापीठीय विद्यार्थ्यांसाठी सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्ती योजना, **३.** अपंग विद्यार्थ्यांसाठी देण्यात येणारी पोस्ट मॅट्रीक शिष्यवृती योजना या तीन योजनांची ऑनलाईन पध्दतीने अंमलबजावणी करण्यात येते. सदरहू योजनेची सविस्तरमाहिती संचालनालयाच्या www.dhepune.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

सन २०१८-१९ मध्ये महाविद्यालय / संस्था यांचे एनएसपी पोर्टलवर दुबार नावांची नोंद असणे, महाविद्यालयांचा AISHE CODE नसणे, एकापेक्षा अधिक महाविद्यालयाचा भ्रमणध्वनी क्रमांक एकच असणे इ. कारणांमुळे महाविद्यालयांची / संस्थांची माहिती NSP पोर्टलवरुन काढण्यात आलेली असून, याबाबत अल्पसंख्यांक कार्यमंत्रालय, दिल्ली यांच्या दि.०५.०७.२०१९ रोजीच्या पत्रान्वये दिलेल्या सूचनांनुसार संस्था / महाविद्यालय यांनी पुढीलप्रमाणे कार्यवाही करणे आवश्यक आहे.

१. सर्व महाविद्यालय / संस्था यांनी त्यांचे लॉगीनमधून ऑनलाईन पध्दतीने AISHE / U-DISE / NCVT / SCVT Code सह NSP पोर्टलवर पुन्हा नोंदणी करणे आवश्यक आहे.

२. सद्यस्थितीत NSP पोर्टलवर नोंदविण्यात आलेले महाविद्यालय / संस्था यांचे ई-मेल आयडी, मोबाईल क्रमांक हे वगळण्यात आलेले आहेत.

३. महाविद्यालय / संस्थांनी NSP पोर्टलवर दिलेल्या सूचनांचा काळजीपूर्वक अभ्यास करुन ऑनलाईन अर्ज भरावा. अर्जामध्ये AISHE / U-DISE / NCVT / SCVT Code याप्रमाणे महाविद्यालयाचे नांव व इतर माहिती असणे आवश्यक आहे. सदरच्या माहितीमध्ये तफावत आढळल्यास आपल्या महाविद्यालयाचे नांव पोर्टलवर समाविष्ट करण्यात येणार नाही याची दखल घ्यावी.

४. महाविद्यालय / संस्थांनी ऑनलाईन पध्दतीने NSP पोर्टलवर नोंदणीसाठी भरलेला अर्ज पडताळणी करीता दोन प्रतींमध्ये संचालनालयास व्यक्तीशः सादर करणे आवश्यक आहे. अशा अर्जांची साक्षांकित / मूळ कागदपत्रांसह संचालनालय स्तरावर छाननी करण्यात येणार असून, त्यानंतरच संबंधित महाविद्यालय / संस्था यांना पुढील कार्यवाही करता येणार आहे.

५. NSP पोर्टलवर महाविद्यालयाच्या नोंदणीसाठी ऑनलाईन अर्जामध्ये Institute Nodel Officer तसेच Head of Institute यांची माहिती भरावयाची आहे. अर्जामध्ये नमूद केलेल्या Institute Nodel Officer यांच्या मोबाईल क्रमांकावर सदर महाविद्यालयाचा User ID, Password, OTP तसेच पोर्टलसंबंधित सर्व माहिती कळविण्यात येणार आहे. त्यामुळे सदरची माहिती अचूक नमूद करणे आवश्यक आहे.

६. महाविद्यालय / संस्था यांनी ऑनलाईन पध्दतीने भरलेला अर्ज दोन प्रतींत, अर्जासोबत अपलोड करण्यात आलेले ओळखपत्र (Govt. Issued ID Proof) तसेच AISHE / U-DISE / NCVT / SCVT Code

याबाबतचे प्रमाणपत्र इ. कागदपत्रे महाविद्यालयाच्या Covering Letter सह पडताळणी करीता संचालनालयास दाखल करणे आवश्यक आहे.

७. कागदपत्रांची पडताळणी करुन महाविद्यालयांना अर्जाची एक प्रत देण्यात येईल. सदरची प्रत महाविद्यालयांनी जतन करुन ठेवणे आवश्यक आहे. सदर अर्जाची प्रत संबंधित अधिकाऱ्यांनी वेळोवेळी मागणी केल्यानंतर दाखविणे आवश्यक आहे.

८. सदर शिष्यवृत्तीसाठी दि.१५ जुलै २०१९ पासून अर्ज भरण्याची प्रक्रिया सुरु झालेली आहे. आपल्या महाविद्यालयाची / संस्थेची पोर्टलवर नोंदणी झाल्याशिवाय महाविद्यालयांना पुढील कार्यवाही करता येणार नाही ही बाब विचारात घेता आपल्या महाविद्यालयाची / संस्थेची पोर्टलवर नोंदणी प्रथम प्राधान्याने करावी.

९. ज्या महाविद्यालय / संस्थांची अद्याप पर्यंत NSP पोर्टलवर नोंदणी (Registration) झालेली नाही अशा महाविद्यालयांनी / संस्थांनी दि.३०.०७.२०१९ पर्यंत पोर्टलवर नोंदणी करणे आवश्यक आहे.

१०. तरी याबाबत दि.२५.०७.२०१९ व दि.२६.०७.२०१९ या कालावधीत प्रस्तूत कार्यालयाचे अधिनस्त जि.ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्हयांतील महाविद्यालयांनी कागदपत्रांच्या छाननीसाठी **मा. शिक्षण संचालनालय, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे-४११ ००१** येथे कार्यालयीन वेळेत समक्ष उपस्थित राहणे.

RSDhemmarkar

विभागीय सहसंचालक,
उच्च शिक्षण, कोकण विभाग, पनवेल

प्रति,
**प्राचार्य/संस्था प्रमुख,**
सर्व अशासकीय अनुदानित व विना-अनुदानित, कायम विना-अनुदानित कला, वाणिज्य, विज्ञान, विधी व अध्यापक महाविद्यालये, जि. ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग.

प्रत माहितीस्तव सादरः
मा. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे.